# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/12/2022 (सोमवार) सकाळ

---

**पोलीस ठाणे रामटेक परिसरातील खुन प्रकरणाचा उलगडा**
**स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिण यांची कारवाई**

दिनांक ०३/१२/२०२२ रोजी फिर्यादी नामे— दत्तुजी सुखदेव नितनवरे, वय ५८ वर्ष, रा. बोरी (राणी), त. पारशिवनी यांनी पोलीस ठाणे रामटेक येथे तोंडी रिपोर्ट दिली की, त्यांचा लहान मुलगा नामे संघपाल नितनवरे, वय २३ वर्ष, रा. बोरी(राणी) हा रोजमजुरीचे काम करून मित्रा सोबत राहुन दारू पिण्याचे सवयीचा होता. सकाळचे सुमारास संघपाल नितनवरे हा मौजा चाचेर ते हनुमान नगर शिवारात रोडलगत मृत अवस्थेत दिसुन आला, त्याचे चेह—यावर माराच्या जखमा दिसत होत्या व चेहरा रक्ताने माखलेला होता तसेच त्याचे पोटावर, पायावर, हातावर तसेच गुप्तांगावर जखमा दिसुन आल्याने संघपाल नितनवरे याचा कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणा वरून कोणत्यातरी वस्तुने मारहाण करून खुन केल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे रामटेक येथे अपराध क्रमांक ७०१/२२ कलम ३०२ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे समांतर तपासा दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने संशयीत इसम नामे १) निखिल उर्फ शाहरूख कवडुजी तिरोडे, वय २१ वर्ष, रा. बोरी (राणी), २) योगेश राजकुमार बिंझाडे, वय ३३ वर्ष व ३) देवेंद्र काशीनाथ जगने, वय २७ वर्ष, दोन्ही रा. निमखेडा त. मौदा यांना ताब्यात घेत पथकास मिळालेल्या गुप्त माहीतीचे अनुषंगाने विचारपुस दरम्यान सदर गुन्हयामध्ये नमुद तिनही इसमांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने तिनही इसमांना पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे रामटेक यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले ना. ग्रा., स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक. राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार विनोद काळे, पोलीस हवालदार रोशन काळे, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस नाईक रोहन डाखोरे, पोलीस नाईक विपीन गायधने, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे तसेच सायबर सेलचे पोलीस नाइक सतिष राठोड यांनी पार पाडली. सदर कारवाई मध्ये पोलीस ठाणे रामटेक येथील सहायक पोलीस निरीक्षक अमित पांडे, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोलीस नाइक प्रफुल रंधई यांनी सहकार्य केले.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर